# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. ४७९/२०२०/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. विशाल शरद पगार,<br>हनुमान नगर, माळेगाओ रोड,<br>नांदगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,<br>कळमदरी, ता. नांदगाव, जि. नाशिक | विस्तार अधिकारी (ग्रा. पं.), पंचायत समिती, नांदगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक |

**सुनावणी दिनांक — २७/१०/२०२३**

१. **उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित |

२. **द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ३१/१/२०२०

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती देत नाहीत

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी

३. **माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १६/८/२०१९

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०१५ ते आजपर्यंत

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती** : (१) घरकुल योजनेतून शासनामार्फत कळमदरी गावात सन २०१५ पासून ते आजपर्यंत घर बांधण्यासाठी रहिवाशाना दिलेल्या अनुदानांची म्हणजेच घरकुल अनुदानासाठी आलेले अर्ज, पात्र ठरलेल्या व्यक्तीची नावे, घरकुल अनुदानाची संख्या, घरकुलांसाठी दिलेल्या अनुदानाचा पुरावा, चेक नं. घरकुल योजने अंतर्गत घेतलेल्या सह्या, घरलाभार्थ्यांची नावाची यादी व यादीत असून मंजूर न झालेल्या नावांची यादी व इतर संपूर्ण माहिती . (२) बांधल्या गेलेल्या मुताऱ्या व देखभाल दुरुस्तीवरील खर्च, दुरुस्तीसाठी दिलेले कंत्राट, तपशील, बिले.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** दिनांक २४/३/२०२२ च्या पत्रान्वये एकूण २०४६ पृष्ठाची माहिती अपीलार्थी यांना जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी दिली असल्याचे दिसून येते.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १९/१०/२०१९

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १९/१०/२०१९

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : अर्जाचे उत्तर आणि माहिती न दिल्याने.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा. पं.), पंचायत समिती, नांदगाव यांनी सुनावणी घेऊन दिनांक २६/१२/२०१९ रोजी अपीलार्थी यांच्या प्रथम अपीलावर निर्णय पारित केला असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक कळमदरी यांना १५ दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करून देण्याचे आदेशीत करून प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा —**

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान असे स्पष्ट केले की मागणी केलेली माहिती दीर्घ कालावधीची आणि व्यापक स्वरुपाची असून एकापेक्षा अधिक विषयाची आहे. त्यामुळे अपीलार्थी यांना सदर माहिती घेऊन जाण्याबाबत सूचित केले होते. माहितीचा अर्ज विलंबाने प्राप्त झाला होता. त्यांनी असेही स्पष्ट केले की, दिनांक २४/३/२०२२ च्या पत्रान्वये सर्व माहिती विनामूल्य पुरविण्यात आलेली आहे.

(२) विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २६/१२/२०१९ रोजी निर्णय पारित केला होता असे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

६. **निष्कर्ष —**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी उपलब्ध ममहिती विनामूल्य पुरविलेली आहे, तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २६/१२/२०१९ रोजी निर्णय पारित करून माहिती विनामूल्य पुरविण्याबाबत आदेशीत केलेले आहे.

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

प्रस्तुतचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. आ-३२६६ 30 OCT 2024